**पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यास**
**भाडयाने घेण्यात येणाऱ्या खाज**
**टँकर्स व ट्रक्सच्या दराबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र.टंचाई-१००८/प्र.क्र.४८/पापु १४**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- ११ जून,२००९**

पहा :- १. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.टंचाई-३०९९/प्र.क्र.१३/पापु१४ दि.०१ फेब्रुवारी,१९९९

२. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.टंचाई-३०००/प्र.क्र.८७/पापु-१४ दि.१६ नोव्हेंबर,२०००

३.शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.टंचाई १००५/प्र.क्र.३०५/प १४ दि.२४ जानेवारी २००६

**प्रस्तावना :-**

पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेल्या भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. मात्र टँ व ट्रक्सद्वारे होणारा पाणी पुरवठा हा अत्यंत खर्चिक असल्याने अत्यावश्यक असलेल्या ठिकाण अशाप्रकारे पाणी पुरवठा करण्यात यावा व शक्यतो शासकीय टँकर्संचा वापर करावा असे आ वेळोवेळी निर्गमित करण्यात आले आहेत. तथापि, उन्हाळयात शासकीय टँकर्स अपुरे पडतात त्याचे खाजगी टँकर्स भाडयाने घ्यावे लागतात. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी भाडयाने घ्यावया खाजगी टँकर्स व ट्रकचे दर संदर्भ क्र.२ येथील दि.१६ नोव्हेंबर २००० च्या शासन निर्णयान्वये निशि करण्यात आले आहेत. मागील आठ वर्षात डिझेलच्या दरात व वाहनांच्या सुटया भागांच्या किंमत मोठया प्रमाणात झालेली वाढ विचारात घेऊन खाजगी टँकर्स व ट्रक्सच्या दरात वाढ करण्याची शासनाच्या विचाराधीन होती.

शासनाने ७.५ मे.टन, १० मे.टन, १२ मे.टन या क्षमतेच्या खाजगी टँकरचे भाडे निर्धारित केल आहे.तथापि, सर्वच जिल्हयांमध्ये या क्षमतेचे टँकर उपलब्ध असतातच असे नाही. काही जिल्हयांम कमी जास्त क्षमतेचे टँकरही उपलब्ध असू शकतात. काही जिल्हयांमध्ये टँकर उपलब्ध नसल खाजगी ट्रकवर पाण्याच्या टाक्या बसवून पाणी पुरवठा केला जातो. शासन निर्णयात नमूद क्षमते जास्त किंवा कमी क्षमतेचे टँकर उपलब्ध झाल्यास, त्याचा उल्लेख शासन निर्णयात नसल्याने, त भाडे अदा करताना अडचणी निर्माण होत असल्याने त्याचा पाणी पुरवठा करण्यासाठी विचार केला नाही. त्यामुळे यामध्ये सुसुत्रता आणण्याच्या दृष्टीने टँकरचे भाडे टँकर/ट्रक वर बसविलेल्या पाण्या टाकीच्या पाणी वाहून नेण्याच्या क्षमतेनुसार १ मे.टन या एककामध्ये (unit) ठरवून त्याप्रमाणात खा टँकर/ ट्रकचे भाडे निर्धारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करुन पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी भाड घ्यावयाच्या खाजगी टँकर्स व ट्रक्सचे संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये निश्चित केलेले कमाल पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालय
शाखा:-
आवक नं.:- 29968
17 2009
विशेष नोंद वही नं.:-
कार्य विवरण नं.:-

| टँकर/ट्रकवरील टाकीची पाणी वहन करण्याची क्षमता | कमाल प्रतिदिन भाडे (रुपये ) | कमाल प्रति किलोमीटर भाडे (रुपये ) |
|---|---|---|
| १ मे.टन | ११८.२७ | १.३६ |

२. पाणी पुरवठा करण्याऱ्या टँकर/ट्रकवरील टाकीची पाणी वहन क्षमता आर.टि.ओ. मार्फत प्रमाणित करुन घ्यावी. त्यानुसार टँकर/ट्रकला देण्यात येणारे प्रतिदिन व प्रति कि.मी. भाडे १ मे.टन एककाच्या प्रमाणात देण्यात यावे.

३. पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ खाजगी टँकर/ ट्रक्सद्वारे करावयाच्या पाणी पुरवठ्यासाठी, टंचाईच्या तीव्रतेनुसार किती खाजगी टँकर्स/ट्रकची (पाण्याची टाकी बसविलेले) आवश्यकता निर्माण होईल याबाबतचा अंदाज घेऊन, संबंधित ठेकेदाराकडून निविदा मागवाव्यात. यासाठी निविदासूचना राज्य व जिल्हा पातळीवरील अधिक खपाच्या वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध करावी, जेणेकरून त्यास व्यापक प्रसिद्धी मिळेल. प्राप्त निविदातून कमीतकमी दराची निविदा स्विकारावी.

४. **हे आदेश दिनांक १ ऑक्टोबर २००९ पासून अंमलात येतील.**

५. खाजगी टँकर्स व ट्रक्सच्या मालकांबरोबर हा शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी दि.१ ऑक्टोबर २००९ पासूनच्या पुढील कालावधीसाठी करार केले असतील तर करारनाम्यातील दर उपरोक्त सुधारित आदेशानुसार निश्चित करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येत आहेत.

६. सदर आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.७८/०९/व्यय-३ दि.२४.०३.२००९ अन्वये त्या विभागाने दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

७. सदर शासन निर्णय शासनाच्या w.w.w.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००९०६१११८२९३३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(ज.बा.कुलकर्णी )
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१. विभागीय आयुक्त (सर्व)
२. जिल्हाधिकारी (सर्व)
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
४. पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
५. मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
६. उपमुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा (सर्व)
७. जिल्हा स्थानिक निधी लेखा परिक्षक (सर्व)
८. महालेखापाल महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
९. महालेखापाल महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१०. मुख्यलेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
११. वित्त विभाग व्यय३
१२. म-११/म-७ कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. निवडनस्ती पापु-१४

क्र/महसूल शा/कार्या-२/कावि- [illegible]
जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार
दिनांक:- २०/०६/२०१०

प्रति
① कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) जिल्हा परिषद, नंदुरबार
② उप विभागीय अधिकारी (सर्व)
③ तहसिलदार (सर्व)
यांना प्रस्तुत शासन आदेशातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी

जिल्हाधिकारी, [illegible] करिता